- **ठळक बातम्या**
- भाजपा विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत मुख्यमंत्रिपदासाठी देवेंद्र फडनवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब/ २१वे मुख्यमंत्री म्हणून उद्या घेणार शपथ.
- मागास जिल्ह्यांच्या विकासासाठी जागतिक बँकेकडून राज्याला नव्यानं कर्ज मंजूर
- अन्नधान्याची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी कायदा करण्याची मागणी करत विरोधकांचा आज राज्यसभेतून सभात्याग.

**आणि**

- महसूल गुप्तचर संचालनालयाच्या कारवाईत तस्करीचं सोळा किलो मेफेड्रोन आणि सुमारे एक कोटी ९३ लाख रुपयांची रोकड जप्त

**<><><><><>**

राज्याच्या मुख्यमंत्रीपदाबाबतचं कुतूहल आता देवेंद्र फडनवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यानं संपलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि इतर नेत्यांच्या उपस्थितीत ते उद्या महाराष्ट्राचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. भाजपाच्या गाभा समितीच्या आज झालेल्या बैठकीत

भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी फडनवीस यांची निवड करण्यात आली. या प्रक्रियेसाठी मुख्य निरीक्षक म्हणून केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण आणि गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी यावेळी उपस्थित होते. नवनिर्वाचित आमदार चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी फडनवीस यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व आमदारांनी पाठिंबा दिल्यानंतर पक्षनेतेपदी फडनवीस यांची निवड जाहीर करण्यात आली. देवेंद्र फडनवीस यांनी यावेळी जनतेचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. ते म्हणाले....

**बाईट- देवेंद्र फडनवीस**

महायुतीच्या नव्या सरकारचा शपथविधी उद्या संध्याकाळी मुंबईच्या आझाद मैदानावर होणार आहे. मुख्यमंत्रीपदाची शपथ फडनवीस तिसऱ्यांदा घेणार आहेत, तसंच उपमुख्यमंत्री आणि अन्य मंत्र्यांचा शपथविधीही होणार आहे. फडनवीस यांची मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यामुळे धुळे, नंदुरबार जिल्ह्यातल्या भाजपा कार्यकर्त्यांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला आहे.

**<><><><><>**

विकास प्रक्रियेत मदत करण्यासाठी जागतिक बँकेच्या कार्यकारी संचालक मंडळानं राज्याला ३ डिसेंबर रोजी नव्यानं कर्ज मंजूर केलं आहे. राज्यातल्या मागास जिल्ह्यांचा विकास करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या जागिक बँकेच्या उपक्रमाचा हा भाग आहे. विकासाची संधी निर्माण करणं, खासगी क्षेत्राला प्रोत्साहन देणं हे याचं उद्दिष्ट आहे. ५० हजार **कोटींची** राज्याची अर्थव्यवस्था देशातल्या सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे.

तरीही राज्याच्या जीडीपीपैकी पन्नास टक्के उत्पादन केवळ सात जिल्ह्यांमध्ये होतं. त्यामुळे राज्यातल्या इतर जिल्ह्यांच्या विकासाच्या गतीमध्ये मोठ्या प्रमाणात असमानता आहे. जिल्हा प्रशासनासमोरील आव्हानं आणि खासगी क्षेत्रांकडून शासकीय सेवांसाठी होणारा अपुरा पुरवठा यामुळे जिल्ह्यांचा विकास खुंटतो. राज्याचं एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था बनण्याचं उद्दिष्ट साध्य करायचं असेल तर सर्व जिल्ह्यांचा विकास होणं आवश्यक आहे. या उपक्रमामुळे राज्याच्या सर्व जिल्ह्यात विकासाचं उद्दिष्ट साध्य करायला हातभार लागेल, असं जागतिक बँकेचे भारतातले संचालक ऑगस्ते तॅनो कौम यांनी सांगितलं.

**<><><><><>**

अन्नधान्याची किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यासाठी कायदा करण्याची मागणी करत विरोधकांनी आज राज्यसभेतून सभात्याग केला. आज सकाळी कामकाज सुरू झाल्यानंतर एमएसपी, फेंजल चक्रिवादळ, संभल हिंसाचार आणि अदानी लाचखोरी प्रकरणावर विरोधी पक्षांनी सादर केलेला स्थगन प्रस्ताव अध्यक्ष जगदीप धनखड यांनी फेटाळला. त्यानंतर काँग्रेस आणि आपच्या सदस्यांनी एमएसपी कायद्याची मागणी करत घोषणाबाजी सुरू केली. गेल्या आठवड्यात विरोधकांनी गोंधळ करण्याऐवजी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर स्थगन प्रस्ताव का दिला नाही, या धनखड यांच्या प्रश्नावर काही विरोधकांनी आक्षेप घेतला. तर काँग्रेसचे सदस्य प्रमोद तिवारी यांनी सरकारवर एमएसपी संदर्भातल्या मागण्या पूर्ण न केल्याचा आरोप करत या संबंधित कायदा करण्याची विनंती केली. त्यानंतर काँग्रेस,

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, आप, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्ष सदस्यांसह इतर सदस्यांनी सभात्याग केला.

**<><><><>**

रेल्वे सुधारणा विधेयक २०२४ वर आज लोकसभेत चर्चा झाली. या विधेयकामुळे रेल्वे क्षेत्रात कार्यक्षमता वाढीस लागेल, असं रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी विधेयकावर चर्चा करताना सांगितलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय रेल्वेमध्ये प्रगती आणि परिवर्तन झाल्याचं वैेष्णव म्हणाले. रेल्वेचा अर्थसंकल्प आधीपेक्षा वाढून ५२ हजार कोटी इतका झाला असून गेल्या दहा वर्षांत ४४ हजार किलोमीटरच्या रेल्वेमार्गाचं विद्युतीकरण झालं आहे, असं अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. तर काँग्रेसच्या मनोज कुमार यांनी नव्या विधेयकामुळे रेल्वेचं खासगीकरण होण्याची भिती व्यक्त केली. वंदे भारत गाड्यांमध्ये तिकीटाच्या जास्त दराचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला.

**<><><><>**

बीएसएनएल या तोट्यात असलेल्या कंपनीला केंद्र सरकारनं दिलेल्या पुनरुज्जीवनानंतर कंपनीला नफा झाल्याची माहिती केंद्रीय संपर्क मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नांच्या उत्तरात दिली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या सरकारनं बीएसएनएलच्या ५० हजारांहून जास्त कर्मचाऱ्यांची जबाबदारी घेतल्याचंही ते यावेळी म्हणाले.

**<><><><>**

डीआरआय अर्थात महसूल गुप्तचर संचालनालयानं तस्करीच्या एका प्रकरणात सोळा किलो मेफेड्रोन हा सायकॅट्रॉपीक पदार्थ आणि सुमारे एक कोटी ९३ लाख रुपयांची रोकड जप्त केली आहे. १९८५ सालच्या NDPS या कायद्याच्या तरतुदीनुसार या प्रकरणी एकूण पाच जणांना अटक करण्यात आली आहे. हैद्राबादहून मुंबईला जाणाऱ्या एका बस मधून जाणारे दोन प्रवासी मेफेड्रोन या अंमली पदार्थाची तस्करी करत असल्याची गुप्त माहिती अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्या आधारावरून पाळत ठेवून काल पहाटे या दोन प्रवाशांना अधिकाऱ्यांनी अटक केली. त्यानंतर मुंबईतून आणखी तीन संशयितांना रोख रकमेसह ताब्यात घेतल्याचं वृत्त आहे.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यात झाराप इथं बेकायदा मद्य वाहतूक प्रकरणी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकानं दोघांना ताब्यात घेतलं आहे. त्यांच्याकडून ६१ लाख २८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार मुंबई-गोवा महामार्गावर आज पहाटे ही कारवाई करण्यात आली.

<><><><><>

महाराष्ट्रात चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यात आज सकाळी साडे सातच्या सुमारास भुकंपाचे तीव्र धक्के जाणवले. भुकंपाची तीव्रता ५ पूर्णांक ३ दशांश रिक्टर स्केल असल्याचं राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने जाहीर केलं आहे. तेलंगणा राज्यातील मुलुगु या भुकंपाचा केंद्रबिंदू होता, गोदीवरी नदीच्या

खोऱ्यात भुकंपाचे धक्के कमी अधिक प्रमाणात जाणवले. या दशकातला हा सर्वात तीव्रतेचा भूकंप असल्याचं अभ्यासकांचं म्हणणं आहे. भूकंपात कोणतीही जीवित किंवा वित्त हानी झाल्याचं वृत्त नाही. या भूकंपाबाबत भूगर्भशास्त्राचे अभ्यासक सुरेश चोपणे यांनी अधिक माहिती दिली...

**होल्ड बाईट - सुरेश चोपणे**

**<><><><><>**

नंदुरबार मध्ये कापूसमहामंडळामार्फत कापसाची खरेदी अद्यापही सुरु न झाल्याच्या निषेधात तसंच कापूस उत्पादकांना  हमी भाव मिळत नसल्याचा आरोप करत  आज शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी रस्ता रोको आंदोलन केलं. शेवाळी - नेत्रंग मार्गावर पळाशी फाट्यावरच्या सूतगिरणीजवळ कार्यकर्त्यांनी जवळपास अर्धातास रस्त्यावर ठिय्या दिला. या आंदोलनामुळे महामार्गावरची वाहतूक खोळंबून वाहनांच्या रांगा लागल्याचं दिसून आलं.

**<><><><><>**

२०२६-२७ दरम्यान नाशिक तसंच त्र्यंबकेश्वर इथं होणार असलेल्या कुंभमेळ्यासाठी जिल्हा प्रशासनाची जोरदार तयारी सुरू आहे. त्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी आज सर्व शासकीय यंत्रणांची बैठक घेतली. यावेळी नाशिक महापालिकेच्या सुमारे अठराशे कोटींच्या, त्र्यबंकेश्वर नगरपालिकेच्या ५२२ कोटींच्या, तसंच तर बांधकाम विभागाच्या चाळीस कोटी रुपयांच्या प्राथमिक आराखड्याबाबत चर्चा झाली. कुंभमेळ्यासाठी

आराखडा तयार करताना त्यात सूक्ष्म नियोजन करावं, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केलं.

**<><><><><>**

क्रिकेटमध्ये १९ वर्षांखालील आशिया कप स्पर्धेत भारतानं संयुक्त अरब अमिरातीवर दहा गडी राखून विजय मिळवला. यूएईच्या १३८ धावांचं आव्हान भारतानं सतराव्या षटकातच पूर्ण केलं. आयुष म्हात्रेनं ६७ तर वैभव सूर्यवंशीने ७६ धावा करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.

**//<><><><><>//**